# माहितीचा अधिकार अधिनियम २००५

**माहिती जाहीर करण्याचे मार्ग**

सार्वजनिक प्राधिकरणांनी आपापली संकेत स्थळे निर्माण करून त्यांवर हि माहिती टाकली, तर ते अधिकच चांगले. पण त्याचबरोबर किंवा तोपर्यंत तरी हि माहिती सध्या अस्तित्वात व उपलब्ध असलेल्या अन्य मार्गांनी म्हणजे अहवाल, परिपत्रके, फलक,नियतकालिके , पोस्टर्स, या व अशा अनेक प्रकारच्या छापील स्वरूपात उपलब्ध करून द्यायची आहे.

**नेहमी विचारले जाणारे प्रश्न**

१) **कोणताही नागरिक या कायद्याच्या आधारे तोंडी माहिती मागू शकेल का?**

अर्थातच नाही. या कायद्यातील तरतुदींचा आधार घ्यायचा असेल, तर माहितीची मागणीही लेखीच करावी लागेल.

२) **हा कायदा आल्यामुळे आता माहिती अधिकार कायद्याखाली अर्ज आला तरच माहिती द्यावी, अन्यथा नाही असे आहे का?**

असे अजिबात नाही. सहजपणे दिली जाणारी पूर्वीपासून चालत आलेली माहितीची अनौपचारिक देवणघेवाण असेलच. मात्र माहिती अधिकार कायद्याखाली माहिती मागणे किंवा देणे हे मात्र लेखी असायला हवे. तोंडी झालेल्या देवाणघेवाणीला या कायद्याच्या संदर्भात स्थान नाही. एखाद्याला लिहता येत नाही. म्हणून माहिती अधिकाराखाली तो तोंडी माहिती मागत असेल तर तिचे लेखी अर्जात रूपांतर माहिती अधिका-याने करणे अपेक्षित आहे.

३) **माहिती मागण्याचा अर्ज ठरावीक नमुन्यातच केला पाहिजे का?**

असे बंधन नाही. केवळ सर्वांचे काम सुकर व्हावे यासाठी त्यामध्ये किमान काय काय गोष्टी असाव्यात, याचे मार्गदर्शन म्हणून अर्जाचा नमुना दाखवलेला आहे. त्यामुळे छापील फॉर्मवर अर्ज केलेला नाही. अथवा केलेला अर्ज कोणत्याही पुस्तकात दाखवलेल्या तंतोतंत नमुन्यानुसार नाही, या कारणाने अर्ज नाकारता येणार नाही.

४) **माहिती मागणा-या नागरिकाला, 'ही माहिती कशासाठी हवी आहे,' हे विचारायचा माहिती अधिका-याला अधिकार आहे का?**

माहिती अधिका-याला असा कोणताही अधिकार नाही, माहिती अधिका-याने ते कारण आडून आडून सुध्दा विचारू नये. "माहिती

अर्जदारावर असे कोणतेही बंधन नाही.

**६) आपण जितक्या जास्तीत जास्त प्रमाणात माहिती आपणहून प्रकाशित करू, तितक्या प्रमाणात आपल्याकडे चौकशी करायला येणा-या लोकांची संख्या कमी कमी होईल, हे वाक्य बरोबर आहे का?**

एका दृष्टीने अगदी बरोबर आहे. कारण जी माहिती सहजपणे उपलब्ध आहे, ती विचारायला कोण कशाला येईल? पण त्याचबरोबरीने हेही खरे आहे, की त्या माहितीवर आधारीत आणखी खोलवर माहिती विचारायला मात्र हळूहळू लोक येऊ लागतील आणि नेमके तेच कायद्याला अपेक्षित आहे. कारण त्यातूनच लोकसहभागातून राज्यकारभार ाणि लोकांच्या देखरेखीखाली शासन यंत्रणा, या कल्पना प्रत्यक्षात साकारणार आहेत.

**७) एकाच प्रकारची माहिती अनेक लोकांनी मागितली असली, तर ती केवळ एकाला देऊन भागेल का?**

नाही. प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणेच माहिती पुरवावी लागेल.

**८) एकच माहिती अनेक लोकांना हवी असेल, तर अशी माहिती संकेत स्थळावर (वेबसाईट) ठेवून, सार्वजनिक प्राधिकरण आपल्या माहिती अधिका-याचा वेळ आणि आपली साधनसामग्री वाचवू शकेल का?**

होय, अशा प्रकारे त्या दोन्ही गोष्टी वाचतील. विस्तृत भागातील असंख्य लोक या सुविधेचा फायदा घेऊ शकतील. यासाठी सार्वजनिक प्राधिकरणांनी आपली अधिकाधिक माहिती संकेत स्थळावर टाकावी, हेच कायद्याला अपेक्षित आहे.

**९) समजा, एखाद्या नागरिकाने एकाच अर्जाद्वारे १०-१५ प्रकारची वेगवेगळी माहिती मागितली तर अशावेळी माहिती अधिका-याने काय करावे, असे तुम्हांला वाटते?**

**क)** त्याला एकाहून अधिक अर्ज करायला सांगावे.

क) एका प्रश्नाचे उत्तर मिळाल्यावर मगच त्याने दुसरा प्रश्न विचारावा, असे

ख) ओळीने एकेक प्रश्न विचारायला त्याला सांगावे.

**ग)** दुस-या माहिती अधिका-याकडे अर्ज करायला सांगावे.

**घ)** यांतील एकही पर्याय बरोबर नाही.

**उत्तर – घ ) हे तिन्ही पर्याय चूकच आहेत, कारण –**

**क)** अर्जदाराला एकाहून अधिक अर्ज करायला माहिती अधिका-याने सांगणे म्हणजे

अशा वेळी त्याला तिस-या प्रश्नाचे उत्तर मिळेपर्यंत एकूण तीन महिने थांबावे लागेल. त्यामुळे तसे सांगणे वा सुचवणेही चूकच आहे.

ग) कायद्यानुसार नागरिकाला दुस-या माहिती अधिका-याकडे अर्ज करायलाही सांगता येणार नाही.

इथे कायद्यातील हा बारकावा नीट लक्षात घ्यायला. समजा नागरिकाने मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती त्याच प्राधिकरणात उपलब्ध आहे. आणि काही माहिती दुस-याच कोणत्या तरी वेगळया प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे. असे असले,तरी माहिती अधिका-याने त्याला त्या बाकी माहितीसाठी वेगळा अर्ज घेऊन दुस-या प्राधिकरणाकडे पाठवणे अपेक्षित आहे.

- माहिती अधिका-याने स्वत:च त्याच्या अर्जाची प्रत त्या दुस-या प्राधिकरणाकडे हस्तांतरित करायची आहे.
- ती पाच दिवसांच्या आत हस्तांतरीत करायची आहे.
- या हस्तांतरणाची माहिती अर्जदाराला माहिती अधिका-याने लेखी कळवायची आहे.
- त्याच सार्वजनिक प्राधिकरणातील वेगवेगळया माहिती अधिका-यांकडे वाटून दिलेल्या वेगवेगळया विभागांत जरी ती माहिती उपलब्ध असेल तरी अर्ज स्विकारून माहिती अधिकारी नागरिकांना "तो अर्ज त्या दुस-या माहिती अधिका-याकडे दे, असे सांगू शकत नाही. त्यांने स्वत:च त्या दुस-या माहिती अधिका-याकडून ही माहिती गोळा करून अर्जदारास देणे अपेक्षित आहे.
- प्राधिकरण वेगळे असेल तर माहिती अधिकारी फार तर एवढेच सांगू शकेल की, त्या दुस-या प्राधिकरणाच्या माहिती अधिका-याकडे अर्ज पाठवायची ही एक पायरी वाढली तर उत्तर मिळण्याची मुदत तीस ऐवजी पस्तीस दिवसांपर्यंत वाढेल. त्याऐवजी अर्जदाराने स्वत:च हा अर्ज दुस-या प्राधिकरणाच्या माहिती अधिका-याकडे नेऊन दिला, तर त्याचेच चार-पाच दिवस वाचतील. ही गोष्ट त्यालाही पटू शकेल. पण निर्णय मात्र त्याच्यावर सोडून द्यावा आणि आपण त्याला तसे करायला भाग पाडत नसून केवळ सुचवत आहोत, हे अवश्य स्पष्ट करावे.

**१०)<u>अर्जदाराने मागितलेल्या नमुन्यानुसार (फॉरमॅटमध्ये माहिती देण्याजोगी नसेल तर, माहिती अधिका-याने काय करावे?</u>**

पक्षी आले त्यानी कोणत्या पाणवठयांवर मुक्काम केला,किती दिवस मुक्काम केला, त्यांना किती पिले झाली, त्यांतली पहिल्या महिन्याभरात किती मेली, वगैरे माहिती मला साध्या पोस्टाने माझ्या घरच्य पत्यावर पाठवावी. आपला विश्वासू, सामोजी गोमाजी कापसे".

तर केवळ अर्जाला दहा रूपयांचे तिकिट नियमानुसार लावले आहे आणि पोस्टेज भरायची माझी तयारी आहे, म्हणून मुख्य वनसंरक्षक अधिका-याने ही माहिती मला पुरवायची का?

कायद्यातील तरतुद कोणी तरी इतकी लांबवर खेचायची शक्यता आहे, हे लक्षात घेऊनच अशा परिस्थितीत काय करायचे हेही कायद्यात सांगितलेले आहे.

जर शासकीय साधानसामग्रीचा फार मोठा अपव्यय अशी माहिती गोळा करण्यात आणि अशा प्रकारची माहिती देण्यास होणार असेल, तर अशी माहिती देण्याचे माहिती अधिका-यांवर बंधन नाही. त्यामुळे अशा प्रकारची 'ठोक' किंवा (Vaiuminous) माहिती पुरवण्यास माहिती अधिकारी नकार देऊ शक्तो, मात्र अर्ज नाकारू शकत नाही.

**११) एखाद्या माहिती अधिका-याने केलेली चुकीची कृती त्याने सद्भावनेपोटी केली होती, हे जर तो सिध्द करू शकला , तर त्याच्यावर दंडाची आकारणी देणार नाही, हे बरोबर आहे का?**

होय ! ही गोष्ट अगदी बरोबर आहे.

**१२) जर सहाय्यक माहिती अधिका-याकडे माहिती उपलब्ध असेल, तर त्याने जी अर्जदाराला परस्पर देण्यास काहीच हरकत नाही, नाही का?**

असे म्हणता येणार नाही. कारण सहाय्यक माहिती अधिका-याने पुरवलेली माहिती अपुरी असली, चुकीची असली अथवा दिशाभूल करणारी असली, तर त्याला या कायद्यानुसार शिक्षा होऊ शकणार नाही. कारण या कायद्यानुसार साहाय्यक माहिती अधिका-याचे स्थान पोस्टमनपेक्षा अधिक महत्वाचे वा वेगळे नाही. माहिती देणे, ती संपूर्ण असल्याची, बरोबर असल्याची खात्री करणे, ही सारी जबाबदारी माहीती अधिका-याची आहे. माहितीमध्ये काही चूक आढळल्यास, माहिती अधिकारी दंडास पात्र आहे. सबब सारी माहिती त्याच्या नजरेखालून आणि त्याच्या हाताखालूनच जाणे आवश्यक आहे. सहाय्यक माहिती अधिका-याने परस्पर माहिती दिली आणि त्याने अर्जदाराचे समाधान झाले तर काही प्रश्न उद्भवणार नाही. पण समजा, काही वादाचा प्रश्न आला तर

अधिका-यावर नुसतेच सोपवता येणार नाही. कारण जबाबदारीच्या दृष्टीने कायद्यानुसार त्याचे अस्तित्व नगण्य आहे.

१३) **अर्जदाराने ४८ तासांत माहिती न मिळाल्यास आत्महत्या करण्याची धमकी दिल्यास माहिती अधिका-याने काय करावे?**

जी माहिती न मिळाल्यने एखाद्याचे जीवन वा स्वातंत्र्य धोक्यात येण्याची शक्यता असते, केवळ अशीच माहिती अर्जदाराला ४८ तासांत दिली पाहिजे, असे या कायद्यात बंधन आहे. अन्य कोणतीही माहिती ४८ तासांत दिली पाहिजे असे बंधन नाही. अशी आत्महत्येची धमकी देणा-याला माहिती देण्याची कायद्याने सक्ती नाही. (पण त्याच्यावर अशी जिवावर उदार होण्याची पाळी का आली, याचा सहानुभुतीने विचार करणे आणि त्याचे जीवंन थोडे तरी सुसहय करण्यासाठी ती माहिती शक्य तितक्या त्वरेने देण्याचे त्याला आश्वासन देणे, योग्य ठरेल.)

१४) **दारिद्र्यरेषेखाली असलेल्या एखाद्या अर्जदाराने मागितलेली माहिती फ्लॉपीवर किंवा सीडीवर दिली आणि त्यासाठी माहिती अधिका-याने ५० रूपये आकारले तर ते चालेल का?**

नाही! कारण दारिद्रेरेषेखालील व्यक्तींकडून अर्जाची फी तसेच कोणतेही अतिरिक्त मुल्य आकारायला परवानगी नाही, त्याच्याकडील कागदपत्रांवरून तो दारिद्रय रेषेखालील व्यक्ती आहे की नाही, याची मात्र खात्री करून घ्यावी.

१५) **दारिद्र्यरेषेखालील एखाद्या व्यक्तीने आधी मिळालेली माहिती पुन्हा मागितली, तर अशा वेळी त्याला त्या माहितीबद्दल पैसे आकारता येतील का?**

नाही. कारण दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती माहिती विनामुल्य मिळवायला पात्र आहे.

१६) **एखादी माहिती ई-मेल वरून मागितलेली असेल, तर ती ई-मेलवरूनच पुरवावी लागेल का?**

अर्जदाराने अर्जात ई-मेएल ने माहिती पाठवावी असे म्हटले असेल तर ती ई-मेल ने पाठवता येईल. अन्यथा ई-मेलनेच पाठवावी असे बंधन नाही, मात्र पाठवल्यास फी आधी घेतलेली असायला हवी.

१७) **माहीती पुरविण्यास ३० दिवसांपेक्षा उशीर झाला, तर अर्जदाराकडून घेतलेली फी माहिती अधिका-याने परत करायची का?**